**नियोजन विभाग**
**मादाम कामा मार्ग**
**हुतात्मा राजगुरू चौक**
**६ वा मजला (विस्तार)**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२**

## "Action Room to Reduce Poverty" या नियंत्रण कक्षाच्या नागपूर येथील उपकार्यालयासाठी "वरिष्ठ सल्लागार व कनिष्ठ सल्लागार" यांची नियुक्ती करण्याबाबत

मानव विकास कार्यक्रमांतर्गत नियोजन विभागाचा शासन निर्णय क्र. माविनि २०१०/प्र.क्र.८१/कार्या.१४१८, दि. १९.७.२०११ अन्वये शिक्षण, आरोग्य व बालकल्याण व उत्पन्न वाढीच्या योजना राबविण्यात येत आहेत. मानव विकास कार्यक्रमांतर्गत समाविष्ट असलेल्या २३ जिल्हयांतील १२५ तालुक्यांपैकी १३ जिल्हयातील २७ तालुंक्यामध्ये कौशल्य विकास करुन रोजगार निर्मिती होण्याकरिता विविध संस्था व यंत्रणामध्ये समन्वय व नियंत्रण व्हावे याकरिता संयुक्त राष्ट्र यांच्या सहकार्याने दि.२२.१.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये "Action Room to Reduce Poverty" हा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सदर शासन निर्णय www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या नियंत्रण कक्षाच्या नागपूर येथील नव्याने स्थापन करण्यात आलेल्या उपकार्यालयासाठी १ "वरिष्ठ सल्लागार (Senior Consultant" व १ कनिष्ठ सल्लागार (Consultant) " अशी दोन पदे भरावयाची आहेत.

२. मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत नियोजन विभागाच्या शासन निर्णय क्र.माविका-२०१७/प्र.क्र.२९/का-१४१८, दिनांक २२/०१/२०१८ अन्वये स्थापन करावयाच्या नागपूर येथील उप कार्यालयासाठी इच्छुक सेवानिवृत्त अनुभवी अधिकारी व्यक्तींकडून या जाहीरातीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांकरिता खालील विवरणपत्रात दर्शविल्यानुसार वेतनश्रेणी, अनुभव, कोणत्या संवर्गातून पद भरणे अपेक्षित आहे, पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील राहील.

| अ. क्र. | पद | एकूण पदे | खालील संवर्गातील उमेदवारांनी अर्ज करावेत | अनुभव | वेतनश्रेणी | कर्तव्य व जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ सल्लागार (Senior Consultant) ( नागपूर येथील उपकार्यालया साठी) | १ | अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील (गट-अ) चे सेवानिवृत्त अधिकारी | सह संचालक (गट-अ) संवर्गातील उप आयुक्त (नियोजन) या पदावर किंवा उप संचालक (गट-अ) संवर्गातील जिल्हा नियोजन अधिकारी या पदावर किमान ३ वर्षे कामाचा अनुभव | सा.प्र.वि., शा.नि. दि.१७.१२.१६ प्रमाणे अनुज्ञेय राहील. (सेवानिवृत्त अधिकाऱ्यांस नियुक्तीच्या वेळी | १. जिल्हा स्तरावर "Action Room to Reduce Poverty" अंतर्गत कार्यक्रमाचे कार्यान्वयन करणे व कार्यान्वयन यंत्रणा तसेच जिल्हा नियोजन अधिकारी /सहायक जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास) यांच्याशी समन्वय साधणे.<br>२. जिल्हा स्तरावर "Action Room to Reduce Poverty" कार्यक्रमाच्या |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | महागाई भत्त्यांसह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढे वेतन (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल.) | अंमलबजावणीचा आढावा घेणे व पाहणी करणे.<br>४. जिल्हा स्तरावर "Action Room to Reduce Poverty" कार्यक्रमासंदर्भात विविध भागीदार यांच्याशी संपर्क करणे व बाजारपेठ उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करणे.<br>५. जिल्हा स्तरावर "Action Room to Reduce Poverty" कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सुयोग्य अंमलबजावणीसाठी जिल्हा वार्षिक कृती आराखडा तयार करण्यास जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास) यांना सहाय्य करणे. |
| २ | कनिष्ठ सल्लागार (Consultant) ( नागपूर येथील उपकार्यालयासाठी) | १ | अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील (गट-ब) चे राजपत्रित दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी | संशोधन अधिकारी/ सांख्यिकी अधिकारी या संवर्गातील सहायक जिल्हा नियोजन अधिकारी या पदावरील किमान ३ वर्षे कामाचा अनुभव | सा.प्र.वि., शा.नि. दि.१७.१२.१६ प्रमाणे अनुज्ञेय राहील. (सेवानिवृत्त अधिकाऱ्यांस नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यांसह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढे वेतन (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल.) | १. जिल्हा स्तरावर "Action Room to Reduce Poverty" कार्यक्रमाचे कार्यान्वयन करणे व "वरिष्ठ सल्लागार (Senior Consultant)" यांना सहाय्य करणे<br>२. जिल्हा नियोजन अधिकारी /सहायक जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास) यांच्याशी समन्वय साधणे. |

३. उपरोक्तप्रमाणे अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज "उप सचिव (का.१४१८,) नियोजन विभाग, ६ वा मजला, विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई" यांचेकडे प्रत्यक्ष किंवा desk1418.plan-mh@gov.in या ई-मेल आयडीवर १५ दिवसात सादर करावेत.

(वि.फ.वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

F:\Desktop Backup\2016\CR\CR-57-2018 Action Room च्या नवीन कार्यालयासाठी पद स्थापना.docx